# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 16/10/2021 (शनिवार)

(दुपार)

---

### विनयभंग

पो.स्टे. बेला :– दिनांक 12/10/2021 चे 20.30 वा. ते दिनांक 13/10/2021 चे 08.30 वा. दरम्यान आरोपी नामे– रिंकु भागवत म्हैसकर वय 40 वर्षे रा. बेला वार्ड क्र 5 ता.उमरेड जि. नागपुर याने फिर्यादी/पीडिता वय 14 वर्ष हिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. यानंतर आरोपीने पीडितेस याबाबत ''तुझ्या वडीलांना काही सांगीतल्यास तुला व तुझे घरच्यांना जिवे मारून टाकीन'' अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम 354 (अ)(1),506(ब) भादंवी. सहकलम 10, 8 बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री पंकज वाघोडे मो.नं. 7304210724 हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 5 किमी. अंतरावरील मौजा जुनोनी शिवार येथे दिनांक 08/10/2021 चे 17.00 वा. दरम्यान भगवान दयाराम राउत (मृतक), वय 45 वर्ष रा. जुनोनी ता उमरेड जि. नागपूर हे जुनोनी शिवारातील नंदुजी बारई रा.उमरेड यांचे ठेक्याने केलेले शेतातील पराठी पीकावर किटकनाशक विषारी औषध मारतांना नाकातोंडात गेल्याने त्यांची प्रकृती 2 दिवसापासुन खराब झाली. त्यांना उपचारा करिता प्रथम ग्रामीण रूग्णालय उमरेड व नंतर नागपुर मेडीकल कॉलेज येथे दि. 10/10/2021 चे 10.47 वाजता भरती केले. उपचार दरम्यान वार्ड एच.ओ. साहेब त्यास तपासुन 13/10/2021 चे सायंकाळी 07.00 वाजता मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा राजेश माकडे मेडीकल पोलीस बूथ नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक भोजराज झाडे मो.नं. 8999434272 हे करीत आहे.

### सर्पदंशामुळे मृत्यु

पो.स्टे. पारशिवनी :– रोहीत रामकृष्ण साकोरे (मृतक), वय 18 रा. पालोरा हा दि. 13/10/21 चे सुमारास नयाकुंड शिवाराचा शेतात बकऱ्या चारीत असतांना त्याच्या पायाला अचानकपणे सापाने चावा घेतला. त्याची प्रकृती खराब झाल्याने त्याला उपचारा करीता प्रथम ग्रामीण रुग्णालय पारशिवनी व नंतर दि. 13/10/21 चे 23.00 वा. मेयो हॉसपिटल नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दि. 14/10/21 चे 23.55 वा. डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. सदर मर्ग संबधाने पो.स्टे. पारशिवनी येथे कागदप्रत्रे प्राप्त झाल्याने सदरचा मर्ग नोंद

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा देवानंद उकेबोन्द्रे यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा देवानंद उकेबोन्द्रे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर